B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII) | ISSN : 2278-9308 November, 2020

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

## November - 2020

ISSUE No – CCLXIII (263)

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.S.N.Jadhavar
Editor :
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

Dr.R.M.Hajari
Executive Editor:
Principal
Sham Gadale Art's College, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

Aadhar International Publications

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020


| | | |
|---|---|---|
| 20 | एच.आय.व्ही सह जीवन जगणाऱ्या विधवांच्या समस्या –एक अन्वेषणात्मक अभ्यास. **सुषमा शंकर तिनगोटे** | 79 |
| 21 | शोध – शीतला देवीचा प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के | 83 |
| 22 | धर्माधिष्ठित तत्वज्ञानाचा महिलांवरील अत्याचार एक चिकित्सा (विशेष संदर्भ मूरळी देवदासी जोगतीण) डॉ. अनिता व्यकटराव शिंदे | 87 |
| 23 | प्राचीन भारतातील कर्तबगार स्त्रिया आणि स्त्रियांचा दर्जा- एक दृष्टिक्षेप **प्रा.डॉ.संतोष रोहिदास पहारे** | 90 |
| 24 | 'हैदराबाद मुक्ती सग्रामात स्त्रियाचे योगदान डॉ.राजाराम रा पिपळपल्ले | 93 |
| 25 | भारताच्या अज्ञात इतिहासातील कर्तबगार राणी दुर्गावतीचा इतिहास प्रा.डॉ. राजविरेंद्रसिंग रुबजी गावित | 98 |
| 26 | महिला सक्षमीकरणाची संकल्पना आणि सामाजिक-सांस्कृतिक व आर्थिक आशय **प्रा. शरद बाबुराव सोनवणे** | 102 |
| 27 | भारतवर्ष की ऐतिहासिक महिलाओं का देश के प्रति योगदान स्त्री विमर्श **डॉ. रज़िया शहेनाज़ शेख अब्दुल्ला** | 105 |
| 28 | पचायती—राज मे महिला नेतृत्त्व और अशिक्षा सद्दाम हुसैन | 108 |
| 29 | औरंगाबाद शहरातील एच.आय.व्हि सह जीवन जगणाऱ्या रूग्णांना सेवा पुरविणाऱ्या व्यावसायिकाचे एच आय.व्हि चे प्रमाण व परिणामाबाबत मत **सुषमा शंकर तिनगोटे** | 112 |
| 30 | पंचायत राज व्यवस्थेतील विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या महिलांचा राजकीय सहभाग विशेष संदर्भ कळब तालुका **डॉ. नामानंद गौतम साठे** | 117 |
| 31 | प्रमुख १४ बँकांचे राष्ट्रीयकरण श्रीमती इंदीरा गांधी यांची भुमिका एक चिकित्सक अभ्यास प्रा. डॉ. एस एल मेढे | 119 |
| 32 | मराठवाड्यातील स्त्री चळवळीचा चिकित्सक अभ्यास डॉ. मुळे पी एम | 123 |
| 33 | कौटुंबिक हिंसाचार भारतीय महिला **प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव** | 126 |
| 34 | बौध्द धर्मातील स्त्रीयांचे स्थान व भूमिका **प्रा.डॉ.सुवर्णा उमाकांत टेंकाळे (वाले)** | 128 |
| 35 | सावित्रीबाई फुलेंची कामगिरी **प्रा.कांबळे शिवाजी ईरबा** | 132 |
| 36 | भारतीय शेती व शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला डॉ.एम डी कच्छवे | 135 |
| 37 | मराठी साहित्यातील स्त्रीचित्रण . एक अभ्यास **प्रा डॉ रामहारी मायकर** | 140 |
| 38 | स्त्रीवादी साहित्य मुळाटे **श्रीधर सुधाकर** | 144 |
| 39 | मराठी स्त्रीवादी साहित्य **प्रा.डॉ. हरिचंद नांगसू नरेटी** | 147 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 263 (CCLXIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

# शोध – शीतला देवीचा

प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के
संशोधन मार्गदर्शक, प्रमुख, इतिहास विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर. जिल्हा नांदेड.
arvindsontakke72@gmail.com

जगातील प्राचीन उपासनेत शक्ती उपासनेला अनन्यसाधारण महत्त्व दिसून येते. मानवी जीवनात स्त्रीचे असलेले महत्त्व याचे मुख्य कारण असू शकते. मातेच्या रूपात प्रजनन आणि संगोपन या दोन्ही गोष्टी स्त्रीकडे असल्यामुळे मातृ उपासना जगामध्ये सुरू झाली असावी. भारतात आणि भारताबाहेर कित्येक ठिकाणी मातृ देवतेच्या मूर्ती आढळून येतात. बलुचिस्थान, इराण, मेसोपोटेमिया, तुर्कस्तान, पॅलेस्टाईन, सीरिया, इजिप्त येथेही स्त्री अथवा मातृ देवतेच्या मूर्ती आढळून आलेले आहेत. निरनिराळया मूर्तींचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, शक्तीची उपासना तीन प्रकारे केल्या जाते. एक म्हणजे दिगंबर रूपा मध्ये, दुसरे रूप म्हणजे लहान मुलासह आणि तिसरा भाग म्हणजे दिग्वसना स्त्री दाखवितात पण मुखाच्या ठिकाणी कमळासारखी फुले, पशु किंवा पक्षाचे तोंड असते.(1)

**उद्देश :-** मुखेड येथील दशरथेश्वर मंदिराच्या बाह्यांगावरील एक मूर्ती ही ज्येष्ठा किंवा अलक्ष्मीची मूर्ती नसून प्रस्तुत मूर्ती ही देवी शीतला मातेची मूर्ती असल्याचे सिद्ध करणे हा आहे.

**संशोधन पद्धती :-** मूर्तीशास्त्राच्या दृष्टीकोनातून सदरील मूर्तीचे विश्लेषण केलेले आहे.

**प्रमुख शब्द :-** शीतला, ज्येष्ठा, अलक्ष्मी, मंदिर, वेताळ, पिशाच्य, भुते.

**स्थान :-** मुखेड हे ठिकाण महाराष्ट्र आणि तेलंगणा सीमेवर वसलेले तालुक्याचे गाव असून त्याचे 18º42'7.8768"N & 77º22'12.6696"E असे भौगोलिक स्थान आहे.

नांदेड जिल्ह्यातील तालुका मुखेड येथे दशरथेश्वर मंदिर असून हे शिवमंदिर आहे. मंदिराच्या बाह्य अंगावर अप्रतिम असे शिल्पांकन असून त्यात नृत्यमग्न सप्तमातृकाही आहेत. ज्या सहसा इतर कुठल्याही मंदिरावर आढळून येत नाहीत. याच बाह्य भागावरील मूर्तीत उत्तरेकडील शिल्पपटात पश्चिमाभिमुख एक मूर्ती असून ही मूर्ती शीतला देवीची आहे. मंदिराच्या एका कोपऱ्यामध्ये ही मूर्ती असून ही देवी स्थानक आणि चतुर्भुज आहे. तिने प्रदक्षणा क्रमाने उजव्या खालील हातात सुरा, उजव्या वरील हातात केरसुणी, डाव्या वरील हातात सूप आणि डाव्या खालील हातात कपालपात्र घेतले आहे. ही सारी लक्षणे मूर्तीशास्त्रानुसार शीतला देवीची ठरतात. परंतु काही अभ्यासकानी ही मूर्ती लक्ष्मीची मोठी बहीण 'अलक्ष्मी' किंवा 'ज्येष्ठा' असल्याचे प्रतिपादन केले आहे. देवीने मुकुट घातला असून त्यावर एक 'असुर मुंड' आहे. जाडसर कुंडले आणि डाव्या खांद्यावरून मुंडमाला धारण केलेली आहे. देवीचे शिल्प नग्न असून पादपिठावर तिचे वाहन गाढव कोरण्यात आलेले आहे. मूर्तीशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. ब. देगलूरकर आपल्या 'टेम्पल आर्किटेक्चर अँड स्कल्पचर्स ऑफ महाराष्ट्र' या ग्रंथात तिचा उल्लेख 'काली' असे करतात. डॉ. किरण देशमुख यानी ही मूर्ती जेष्ठा देवीची असल्याचे म्हटले आहे. असेच मत प्रा. गजानन पाटील, डॉ. अशोक सावणे आणि डॉ. अनिल कठारे यानीही व्यक्त केले आहे. त्यामुळे मूर्तीशास्त्राच्या अनुषंगाने प्रस्तुत मूर्तीची पुनश्च ओळख करून घेणे गरजेचे आहे. स्कन्द पुराण 7.134.2, 7.135.1-7, नारद पुराण 1.118.95-99, आणि भविष्य पुराण प्रतिसर्गपर्व 4.3.54(2) नुसार देवीचे वर्णन पाहता ही मूर्ती शीतला देवीची मूर्ती ठरावी. या अनुषंगाने आपण काही बाबींचा मागोवा घेऊया.

डॉ. किरण देशमुख यानी सदरील मूर्तीच्या हातातील आयुधे 'मराठवाड्यातील देवताची रूपे'(3) या पुस्तकात, "प्रदक्षिणा क्रमात सुरा / छुरीका, निलोत्पल (निळे कमळ ), शूर्प (सूप ) आणि कपाल या वस्तू असून तिच्या डावीकडे खाली गाढव उभे आहे." असे नमूद केले आहे. तर त्यांच्याच दुसऱ्या एका 'महादैव्यैनमोनमः'(4) या पुस्तकात, " तिने उजव्या खालील हातात सुरा तर, उजव्या वरील हातात केरसुणी घेऊन, डाव्या वरील हातात नीलोत्पल धरले असून, डाव्या खालील हातात कपाल पात्र घेतली आहे." असा उल्लेख केला आहे. त्यांच्या या दोन्ही ग्रथातील मांडणी

परस्पर विसंगत आहे. त्याच प्रमाणे प्रा. पाटील, डॉ. साबणे आणि डॉ. कठारे यानी 'प्राचीन शिव आणि जैन मंदिरे'(5) या ग्रंथात, "प्रदक्षणा क्रमाने खालच्या उजव्या हातात खड्ग, वरच्या हातात मशाल (मुळात ही मशाल नसून मार्जन / खराटा / केरसुनी / झाडू आहे.), डाव्या वरच्या हातात सूप तर खालच्या हातात पात्र आहे." असा उल्लेख केला आहे. तसेच देवीने कपाल पात्र धरलेल्या हाताला खालून ज्या वेताळाने धरलेले आहे तो 'पुरुष' असून तो दिगंबर अवस्थेत असल्याने त्याचे लिंग स्पष्ट दिसत असूनही त्यास या लेखक त्रयींनी 'स्त्री' म्हटले आहे. विशेष म्हणजे असेच मत डॉ. किरण देशमुख यानीही नोंदविले आहे. वाहन म्हणून असलेले गाढवाचे शिल्प पाहता मूर्तीशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. देगलूरकर यानी नमूद केलेली ही देवी काली होऊ शकत नाही. तसेच डॉ. देशमुख आणि प्रा. पाटील, डॉ. साबणे, डॉ. कठारे याच्या मताप्रमाणे ही 'ज्येष्ठा' ही होत नाही. ही मूर्ती शीतलादेवीची असून त्यासाठी खालील काही बाबीचा आपल्याला आढावा घ्यावा लागेल. विष्णूधर्मेतरपुराणानुसार ज्येष्ठा देवीची दोन रूपे आहेत – रक्त ज्येष्ठा आणि नील ज्येष्ठा. ज्येष्ठा ही व्दिभूज असून तिच्या एका हातात निलोत्पल असते व दुसरा अभय मुद्रेत असतो. प्रतिमेत मात्र पुष्कळदा निलोत्पल नसून तिचा हात माडीवर टेकलेला असतो. शरीराने ती लाबट ओठाची, लबस्तनी आणि जाड मांड्याची असते. तिच्या जवळ केरसुणी आणि कावळा बसलेला ध्वज असतो. गाढव हे तिचे वाहन होय.(6) या वर्णनाचा आढावा घेतल्यास प्रस्तुत मूर्ती सडपातळ, पुष्ट स्तना आणि रेखीव मांड्याची असून त्या मुळे ती 'ज्येष्ठा' होऊच शकत नाही. देवी शीतलेच्या संदर्भाने स्कन्द पुराणातील उल्लेखा नुसार 'शीतला' देवी गौरवर्णा, त्रिनेत्री, निर्वसना, गर्दभारुढा आणि जलपात्र असलेली म्हटले आहे. नारद पुराणानुसार कलश, मार्जनी धारिणी, निर्वस्त्र आणि गर्दभारुढा असे वर्णन आहे. तर शीतलाष्टका नुसार,

वन्देऽहं शीतला-देवीं, रासभस्थां दिगम्बराम् ।
मार्जनी-कलशोपेतां, शूर्पालङ्कृत-मस्तकाम् ।।1।।
वन्देऽहं शीतला-देवीं, सर्व-रोग-भयापहाम् ।
यामासाद्य निवर्तन्ते, विस्फोटक-भयं महत् ।।2।।
शीतले शीतले चेति, यो ब्रूयाद् दाह-पीडितः ।
विस्फोटक-भयं घोरं, क्षिप्रं तस्य प्रणश्यति ।।3।।
यस्त्वामुदक-मध्ये तु, ध्यात्वा पूजयते नरः ।
विस्फोटक-भयं घोरं, गृहे तस्य न जायते ।।4।।
शीतले ! ज्वर-दग्धस्य पूति-गन्ध-युतस्य च ।
प्रणष्ट-चक्षुषां पुंसां, त्वामाहुः जीवनौषधम् ।।5।।
शीतले ! तनुजान् रोगान्, नृणां हरसि दुस्त्यजान् ।
विस्फोटक-विदीर्णानां, त्वमेकाऽमृत-वर्षिणी ।।6।।
गल-गण्ड-ग्रहा-रोगा, ये चान्ये दारुणा नृणाम् ।
त्वदनुध्यान-मात्रेण, शीतले! यान्ति सङ्क्षयम् ।।7।।
न मन्त्रो नौषधं तस्य, पाप-रोगस्य विद्यते ।
त्वामेकां शीतले! धात्री, नान्यां पश्यामि देवताम् ।।8।।(7)

अर्थात "गाढवावर विराजमान, दिगंबरा, हातात झाडू अथवा कलश धारण करणारी, सुप अलंकृत मस्तकवाली, भगवती शीतलास मी वंदन करतो." असे पहिल्या चरणात म्हटले आहे. सदर मूर्ती ही दिगंबरा असून हाती झाडू, सूप, कपालपात्र आणि सुरा आहे. स्कन्द पुराणातील वर्णना प्रमाणे हाती कलश नसून सुरा दाखवण्यात आलेला आहे. कारण ही मूर्ती संहार मूर्ती असून ती 'ज्वरासूर' अर्थात 'ज्वर' दैत्याचा संहार करणारी आहे. गळयात असलेली मुंडमाला ही लक्षणेही शिवाशी संबंधित आहेत. त्याचप्रमाणे किरीट मुकुटावरही एक मुंड कोरण्यात आलेला आहे. देवीच्या बाजूला तिचे गण वेताळ आणि पिशाच्य दाखविलेली आहेत. प्रस्तुत मूर्ती आकाराने 106 cm बाय 52 cm आहे. मूर्तीतील प्रत्येक आयुधाचा आपण प्रथमतः विचार करु. सुरा अथवा छुरीका हे संहार शास्त्र आहे. या मूर्ती

मध्ये कलश नसून ती ज्वर दैत्याचा नाश करीत असल्याने सुरा दाखविलेला आहे. देवी अलक्ष्मीने कोणाचाही संहार केलेला नाही. तर झाडू हे स्वच्छता दर्शक लक्षण आहे. तर सूप हे थंड हवा देण्यासाठी वापरण्यात येते. कपाल पात्र हे दैत्य रक्त प्राशन करण्यासाठी उपयोगात आणले जाते. ही देवी वैज्ञानिक दृष्टीने महत्वपूर्ण आहे. दाहज्वर, पीतज्वर, कांजण्या, दुर्गंधी युक्त फोडे, नेत्र विकार हे रोग दूर करणारी देवता म्हणून शीतला देवी ओळखली जाते. सदरील देवी जवळ लिंबाचे डहाळे आणि पाने ठेवली जातात कारण कडू लिंबाच्या पानांमुळे शीतलता निर्माण होते. कडू लिंबाची पाने अंगावरील फोड सडू नयेत किंवा त्याचे संक्रमण होऊ नये यासाठी उपयोगी येतात. हाती असलेला झाडू हे स्वच्छता आणि सुरक्षितता राखण्यास प्रेरणा देणारे आहे. ऋतू परिवर्तनाणे वातावरणात अनेक बदल होतात. त्या साठी सफाई वर भर दिला गेला पाहिजे. हेच यातून सूचित केले आहे. कांजण्या झाल्यावर शरीर-दाह कमी करण्यासाठी सुपाने वारे देऊन रोग्याला आराम मिळून देता येते. तर गाढव हे वाहन दाखवीण्यामागे वैज्ञानिक कारण आहे. गाढवाची लिद रोग्याच्या अंगास लावल्याने त्याच्या शरीरावरील फोडचे डाग कमी होतात. कांजण्या झाल्यामुळे अंगावरील फोडे फोडण्याचे काम झाडूने अथवा फडा घेऊन करता येते. अशा रोग्यांना थंड पाणी प्यावे असे वाटत असल्याने, शीतला देवीच्या हाती कलश दाखविला जातो. या 'शीतला' देवीस दक्षिणेत 'मरिअम्मा', 'मातंगी' आणि 'वडूगंडाई' अशा नावानेही ओळखले जाते. कांजण्या हा आजार खूप जुना असून ग्रीक मध्ये इसवी सन पूर्व बाराशे मधील एका 'ममीचा' मृत्यू कांजण्या आजाराने झाल्याचे मानले जाते.

सारांश-

१. सदरील मूर्तीच्या गळयात यज्ञोपवीत याप्रमाणे डाव्या खांद्यावरून रुळणारी मुंडमाला ज्यामध्ये एकूण 18 मुंडांची माळ स्पष्ट दिसून येते. तसेच मुकुटावर एक असुर मुंड आहे. ही मुंड माला आणि मुकुटावरील असुर मुंड पाहता शिव परिवारातील देवता 'शीतलादेवी' असल्याचेच सिद्ध होते. 'ज्येष्ठा' किंवा 'अलक्ष्मी' ही विष्णू परिवारातील देवता असल्याने अलक्ष्मीच्या गळयात मुंड माला येणे आणि कपालपात्र असणे कदापीही शक्य नाही.
२. सदरील मूर्ती देवीपुराण कथेनुसार 'दिगंबरा' आहे.
३. हाती सूप आणि झाडू धारण केलेले आहे.
४. डाव्या खालील हातात 'कपालपात्र' असून हे कपालपात्र शैव 'लांछन' असल्याने ही शीतलाच ठरते.
५. शीतला देवीच्या हाती कलश असतो पण इथे ज्वर-सुराचा नाश करीत असल्याने कलशा ऐवजी छुरिका दाखविली असून ही 'संहार' मूर्ती आहे.
६. 'अलक्ष्मी' ही 'संहार' देवता नसल्याने; हाती सुरा असलेली 'अलक्ष्मी' म्हणता येणार नाही.
७. शीतला देवीच्या पादपीठावर वाहन गाढव आणि वेताळ / पिशाच्च दाखविलेले असून ते ही पूर्णतः नग्न आहेत. (ज्यास 'प्राचीन शिव आणि जैन मंदिरे' या ग्रंथात भुते म्हटले आहे.) असे नग्न वेताळ व पिशाच्च केवळ शिव परिवारातील पौराणिक कथेत असल्याने ही माता शीतलाची मूर्ती ठरावी.
८. विष्णूधर्मेतरपुराणानुसार ज्येष्ठा देवीची लक्षणे ही लांबट ओठाची, लंबस्तनी आणि जाड मांड्याची आणि कावळा असलेला ध्वज असलेली असते, असे म्हटले आहे. परंतु प्रस्तुत मूर्ती ही सडपातळ, पुष्ट स्तना आणि रेखीव मांड्याची असल्यामुळे ही 'ज्येष्ठा' नसून 'शीतला' देवीच आहे.
९. आयुधा मध्ये छुरिका, मार्जन अर्थात झाडू ज्यास डॉ. किरण देशमुख निलोत्पल (निळे कमळ) असे म्हणतात, शूर्प (सूप) आणि कपालपात्र यातील ज्येष्टा देवीची आयुधे आणि वाहन यात बऱ्याच अंशी समानता आहे. उदाहरणार्थ- मार्जन आणि गर्दभ वाहन हे 'ज्येष्टा' देवीचे लांछन असल्याने प्रारंभिक संशोधकांना ही 'शीतला' देवी वाटली नसावी.

वरील सर्व पुराव्यावरून हे सिद्ध होते की, देवी शीतला ही संक्रमना पासून बचाव करण्याची शिकवण देणारी वैज्ञानिक देवी असून सदरील मूर्ती 'ज्येष्ठा' किंवा 'अलक्ष्मी' नसून 'शीतला' देवीची मूर्ती आहे हे सिद्ध होते.

संदर्भ –

1. डॉ. नी. पु. जोशी, भरतीय मुर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती, 1979, पृ. 214.
2. डॉ. मारुतीनंद्र तिवारी; डॉ. कमल गिरी; मध्यकालीन भरतीय प्रतिमालक्षण, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणशी,1997, पृ. 357.
3. डॉ. किरण देशमुख, मराठवाड्यातील देवतांची रूपे, निर्मल प्रकाशन, नांदेड, 2017, पृ. 72 -73.
4. डॉ. किरण देशमुख, डॉ. दत्तात्रय जगदाळे, महादैव्यैनमोनमः, निर्मल प्रकाशन, नांदेड, 2010, पृ. 133 – 134.
5. प्रा. गजानन पाटील, डॉ. अशोक सावणे, डॉ. अनिल कठारे, प्राचीन शिव आणि जैन मंदिरे, पूनम प्रकाशन, कंधार, 2012, पृ. 211 - 212 .
6. डॉ. नी. पु. जोशी, भारतीय मुर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती, 1979, पृ. 249.
7. Chanderprabha.com/2017/08/15/shitalashtakam/, hi.wikipedia.org/wiki/शीतला देवी; सर्व विप्र मार्तंड, सम्पा. विमल शर्मा, रोग विनाशिनी शीतला माता, वर्ष ३, अंक ६, मार्च २०२०, जयपूर, पृ. १२.
8. www.wikipidiya.com, https://hi.wikipedia.org/wiki/शीतला_देवी
9. प्रत्यक्ष सर्वेक्षण. (श्री गजेंद्र बिरादार, डॉ. संजीव डोईवळे आणि श्री आदित्य फडके यांचे सहकार्य लाभले.)

